# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं. ०४/२०२०

| | | |
|---|---|---|
| डॉ. दिलीप खंडेराव पाटील<br>विरूध्द् | } | तक्रारदार |
| १. श्री. वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे खुर्द,<br>ता. वाळवा, जि. सांगली<br>२. वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द,<br>ता. वाळवा, जि. सांगली | } | वि. प |

श्री.वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली या संस्थेचे वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, ता. वाळवा जि. सांगली यांचेकडील प्राचार्य डॉ. दिलीप खंडेराव पाटील यांनी दि. २१/१०/२०२० रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

७ व्या वेतन आयोगानुसार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी वेतन निश्चिती केलेली आहे. मा. सचिव, श्री वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे खुर्द यांनी प्राचार्यांच्या सेवापुस्तिका (मुळ+दुबार) स्वतःजवळ ठेवलेल्या आहेत. त्या न दिल्यामुळे मा. सह.संचालक, कोल्हापूर विभाग यांच्याकडून सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती झालेली नाही ती व्हावी.

दि.१ जानेवारी २०१९ ते सप्टेंबर २०२० पर्यंतचे वेतन तात्काळ मिळावे. वेतन देयकांत नाव समाविष्ठ करणेत यावे. महाराष्ट्र शासन उच्च तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.४८४/१५/वि.शि.१ दिनांक १२ जुलै २०१६ नुसार अंमलबजावणी व्हावी.

**संस्थेचा अभिप्राय :**

१. दि. ०७/१२/२०२० रोजी तक्रारदार यांनी संस्थेकडे कोणताही अर्ज व झेरॉक्स प्रती प्राप्त नसल्याचे व तक्रारदार यांनी मे. पीठासीन अधिकारी महाविद्यालय व विद्यापीठ न्यायाधिकरण,

पुणे/शिवाजी/सोलापूर यांचे कोर्टात दावा दाखल केलेला असल्याने त्यांच्या संदर्भातील सर्व बाबी न्यायप्रविष्ट असलेने अर्ज निकाली काढण्यात यावा असे कळविले आहे.

३. दि. २८/०१/२०२२ रोजी संस्था अध्यक्ष यांनी समितीसमोर सादर केलेल्या म्हणण्यामध्ये तक्रारदार डॉ.दिलीप पाटील यांचे बद्दल चुकीचे नेमणूकीबाबत संस्था व शासन अभिप्राय पत्र. ज्यामध्ये तक्रारदार डॉ.पाटील यांचे असमाधानकारक काम व आर्थिक गैरव्यवहारामुळे संस्थेची इच्छा नसताना शासन निर्णयानुसार ६२ चे ६५ वय देणे भाग पडले. तसेच डॉ.पाटील यांनी वेगवेगळया ठिकाणी महाविद्यालयातील काम केलेला कालावधी देण्यात आलेला आहे. तसेच डॉ.पाटील यांच्या सेवेमध्ये ६९० दिवसांचा सेवाखंड होता. शासनाकडून सेवाखंड क्षमापित होणे आवश्यक आहे. इत्यादी माहिती नमूद केली आहे.

४. दि. २८/०१/२०२२ रोजी संस्था अध्यक्ष यांनी समितीसमोर डॉ.दिलीप पाटील यांचे तक्रार अर्जाबाबत म्हणणे दिले आहे. त्यामध्ये डॉ.डी.के.पाटील यांनी संस्थेकडे किंवा सचिवाकडे प्राचार्य म्हणून स्वताःचे मूळ सेवापुस्तक किंवा दुबार सेवापुस्तक दिलेले नाही त्यामुळे संस्थेकडे ते असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. डॉ.पाटील यांचेबाबत विद्यापीठ परिनियम २१७ प्रमाणे चौकशी नेमूण त्यांच्या अकार्यक्षण कामकाज व आर्थिक गैरव्यवहार यासंबधी चौकशी होवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केला आहे. दि.०१ जानेवारी २०१९ ते सप्टेंबर २०२० पर्यंतच्या त्यांच्या वेतनासाठी देयकात नाव समाविष्ठ करणेसाठी संस्थेने ठरावासह प्रस्ताव दि.०२ डिसेबर २०१९, दि.०५ डिसेंबर २०१९, दि. ०७/१०/२०१९ व दि.०४/१२/२०२१ रोजी मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांचेकडे पाठविलेला आहे.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांनी तक्रार अर्जात मा. सचिव, श्री वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे खुर्द यांनी तक्रारदार यांची सेवापुस्तके (मुळ+दुबार) स्वताःकडे ठेवली आहेत. त्या न दिल्यामुळे मा. सह. संचालक, कोल्हापूर विभाग यांच्याकडून सातव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती झालेली नाही ती व्हावी, दि.१ जानेवारी २०१९ ते सप्टेंबर २०२० पर्यंतचे वेतन तात्काळ मिळावे. वेतन देयकांत नाव समाविष्ठ करणेत यावे इ. तक्रारी अर्जात नमूद केलेल्या आहेत.

तक्रारदार यांनी कथन केलेनुसार ते संस्थेच्या सेवेत दि. ०२ जून २०१६ पासून प्राचार्य पदावर कार्यरत होते. तक्रारदार यांची नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती दि. ३१/१२/२०१८ होती. तथापी ग्रामीण महाविद्यालयातील प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वरून ६५ करण्याबाबतच्या

दि.१२/०७/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार त्यांनी संस्थेकडे मागणी केली होती. संस्थेकडून सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविणेत आला. त्यानुसार ते संस्थेच्या सेवेत सलग होते. संस्थेने दि.०६/०५/२०१९ च्या पत्राने तक्रारदार यांना सेवासमाप्तीचा आदेश दिलेला होता. त्याबाबत तक्रारदार यांनी मे. न्यायाधीकरण, पुणे यांचेकडे दाद मागीतली होती. यादरम्यान संस्थेकडून दि.२२/०६/२०१९ रोजीचा तक्रारदार यांचा सेवासमाप्तीचा आदेश मागे घेतला व त्यानुसार तक्रारदार हे महाविद्यालयाच्या सेवेत पुन्हा हजर झाले. तथापी तक्रारदार यांचे मुळ सेवापुस्तक संस्थेच्या सचिवांनी स्वतःजवळ ठेवले आहे. ते न दिल्यामुळे मा. सह.संचालक कोल्हापूर विभाग यांच्याकडून सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती झालेली नाही, दि.१ जानेवारी २०१९ पासुनचे वेतन देण्यात आलेले नाही.

संस्थेने दिलेल्या दि.२८/०१/२०२२ रोजीच्या लेखी म्हणण्यामध्ये तक्रारदार यांचे महाविद्यालयातील कामकाज समाधानकारक नसताना देखील व संस्थेच्या सर्व विश्वस्त मंडळाची इच्छा नसताना त्यांना शासनाच्या निर्णयानुसार मुदतवाढ दिली होती व त्याबाबतचा प्रस्ताव सहसंचालक कार्यालयास दि.२८/०२/२०२०, दि. ०३/०३/२०२१ व दि.०४/१२/२०२१ रोजीच्या पत्रांनी पाठविणेत आलेला आहे व त्यांच्या वेतनाची जबाबदारी ही शासनाची आहे. तत्कालीन प्राचार्य यांचे सेवा पुस्तके संस्थेकडे सादर केलेली नाहीत त्यामुळे ती देण्याचा प्रश्नच उध्दभवत नसल्याचे म्हटले आहे.

दोन्ही पक्षकारांचे मत अवलोकनी घेता समितीचे मत असे की, संस्थेने दि.०६/०५/२०१९ रोजी केलेल्या सेवासमाप्तीबाबत तक्रारदार यांनी मे. पिठासीन अधिकारी, महाविद्यालय व विद्यापीठ न्यायाधिकरण, पुणे/शिवाजी/सोलापूर यांचेसमोर अपील दाखल केले होते. सदर अपील अंशतः मंजूर होवून तक्रारदार यांची सेवा सलगता धरण्यात यावी तसेच तक्रारदार यांना संस्थेने दि. ३१/०५/२०१९ ते दि.२२/०६/२०१९ पर्यंतचे वेतन अदा करण्याबाबत आदेश झालेचे दिसून येते.

शिवाजी विद्यापीठाचे दि. २८/०६/२०१६ रोजी ॲफि/टी.१/प्राचार्य/चव्हाण/२८३१ या पत्राने तक्रारदार यांना प्राचार्य पदाच्या चेंजिस इन स्टाफ मान्यता दिसून येते. तक्रारदार यांनी मा. उच्च न्यायालयातही रि.पि.१०५०६/२०२१ ने दाखल केली होती. यामधील दि. २७/०५/२०२१ रोजीच्या आदेशानुसार तक्रारदार यांची सेवा दि. ३१/१२/२०२१ पर्यंत मा. सर्वोच्च न्यायालयामधील एसएलपी क्रमांक ९३६८/२०२०, ९३६९/२०२० च्या आदेशास अधिन राहून केल्याचे दिसून येते.

वरील सर्व मुद्दे अवलोकनी घेता समितीच्या असे निर्देशनास येते की तक्रारदार हे सदर संस्थेमध्ये दि. ०२/०६/२०१६ पासून प्राचार्य पदावर कार्यरत आहेत तसेच मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशनानुसार त्यांच्या सेवानिवृत्तीचा कालावधी दि. ३१/१२/२०२१ पर्यंत करण्यात आला. त्यांना विद्यापीठाकडून प्राचार्य पदाची चेंजिस इन स्टाफ मान्यता मिळाल्याचे दिसून येते. मे. पिठासन अधिकारी, न्यायाधिकरण पुणे/शिवाजी/सोलापूर यांचे आदेशानुसार सेवासमाप्ती कालावधीमधील सेवासलगता धरून दि. ३१/०५/२०१९ ते दि. २२/०६/२०१९ पर्यंतचे वेतन देय केले आहे. शिवाजी विद्यापीठ यांनी त्यांची ७ व्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती केली आहे. या सर्व बाबी महत्वाच्या असून संस्थेतर्फे अध्यक्ष यांनी मांडलेले म्हणण्यामध्ये या उपरोक्त सर्व बाबी नाकारलेल्या नाहीत. निव्वळ वेतनाची बाब सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर तथा शासनाची असल्याचे कथन केले आहे.

सबब समिती या निष्कर्षास येते की, तक्रारदार यांची अखंड सेवा ग्राहय धरून त्यांना नियमानुसार देय असणारे वेतन मिळणे आवश्यक आहे. संस्था अध्यक्ष यांनी मा.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार वेतन देयके अदा केले असल्याचे पुरावे या समितीसमोर सादर केलेले नाहीत. सबब तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार दि. १ जानेवारी २०१९ ते सप्टेंबर २०२० पर्यंत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून त्यांचे सेवेस मुदतवाढ मिळाली असलेने संस्थेने ते वेतन अदा करणे बंधनकारक आहे. तसेच सप्टेंबर २०२० पासून ते दि.३१/१२/२०२१ पर्यंतचे वेतन संस्थेने दिलेले नसल्याचे तक्रारदार यांनी समितीसमोर कथन केले आहे. सबब तक्रारदार यांच्या दि.०१ जानेवारी २०१९ ते दि.३१/१२/२०२१ पर्यंतच्या नियमानुसार देय असणारे वेतन देणेबाबत संस्थेने योग्य ती कार्यवाही तात्काळ करने आवश्यक आहे.

तक्रारदार यांनी तक्रार अर्जात मा. सचिव, श्री वारणा शिक्षण संस्था, ऐतवडे खुर्द यांनी तक्रारदार यांची सेवापुस्तीका (मुळ+दुबार) स्वताःजवळ ठेवलेल्या आहेत. त्या न दिल्यामुळे मा. सह. संचालक कोल्हापूर विभाग यांच्याकडून सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती झालेली नसल्याचे नमूद केले आहे.

याबाबत संस्थेने दिलेल्या लेखी खुलाश्यात तत्कालीन प्राचार्य यांनी सेवापुस्तके संस्थेकडे सादर केलेली नाहीत त्यामुळे ती देण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे म्हटले आहे.

याबाबत समितीचे मत असे की, संस्थेकडील कार्यरत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांची सेवापुस्तके जतन करणे ही संस्थेची प्राथमिक जबाबदारी आहे. मुळ सेवापुस्तक गहाळ झाले असलेस

अथवा अन्य कारणाने अद्यायावत नसलेस संस्थेने त्याची प्रत नोंदीसह अद्यायावत करून संबधितांना देणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. त्यामुळे तक्रारदार यांचे मुळ सेवापुस्तक जतन करून त्यातील नोंदीसह ते अद्यायावत ठेवणे ही संस्थेची जबाबदारी असुन ती संस्थेस नाकारता येणार नाही. सबब संस्थेने तक्रारदार यांचे मुळ सेवापुस्तक नियमानुसार अद्यायावत करून सातव्या वेतन आयोगाप्रमाणे विद्यापीठाने केलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतन निश्चितीकरीता तात्काळ पाठविणे बंधनकारक आहे. तसेच तक्रारदार यांचे दुबार सेवापुस्तक देणे कायद्याने बंधनकारक आहे.

करीता सबब समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांच्या दि.०१ जानेवारी २०१९ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीपर्यंत नियमानुसार देय असणा-या वेतनाबाबत योग्य ती कार्यवाही करून सदरचे वेतन आदेश प्राप्त झालेपासून एक महिन्याच्या आत तक्रारदार यांना अदा करावे.

२. संस्थेने तक्रारदार यांचे मुळ सेवापुस्तक अद्यायावत करून सातव्या वेतन आयोगाप्रमाणे विद्यापीठाने केलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतननिश्चितीकरीता पुढील योग्य ती कार्यवाही आदेश प्राप्त झालेपासून एक महिन्याच्या आत करावी. तसेच दुबार सेवापुस्तक प्रत तक्रारदार यांना त्वरीत देण्यात यावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

**दिनांक :** 03/06/2022

सदस्य
( डॉ. व्ही. एन.शिंदे )

सदस्य
(श्री. ए.ए. कुलकर्णी)

सदस्य
( डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य
(डॉ.एन.बी.गायकवाड)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

अध्यक्ष
( श्री.एस.पी.कुलकर्णी )